# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

## अ प्रभाग समिती

### सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक ०७]

वेळ : सकाळी ११.३० वा.

दिनांक : ०९/१०/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर **2018** ची मासिक सभा मंगळवार दिनांक ०९/१०/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सभापती |
| 2. | मा.जावेद रमजान शेख | सदस्य |
| 3. | मा.वैशाली जालिंदर काळभोर | सदस्या |
| 4. | मा.राजू मिसाळ | सदस्य |
| 5. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / माजी उपमहापौर |
| 6. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 7. | मा. सावंत राजेश पोपट | स्वीकृत सदस्य |
| 8. | मा. कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 9. | मा.कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे, क्षेत्रिय अधिकारी, मा. श्री दिपक सुपेकर-प्र.कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री. संजय खाबडे-कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री आर.के.लटपटे –प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), मा.श्री कदम पी.जे.-लेखाधिकारी, मा.श्री. महादेव शिंदे –सहा. आरोग्याधिकारी, मा.श्री एस. व्ही जाधव पोलिस उपनिरिक्षक, मा.श्री मोहन खोंद्रे उपअभियंता(झोनिपु स्थापत्य ), मा.श्री विजय भोजने-उपअभियंता(बीआरटीएस),मा.श्री कुंभार डी. एम.-उपअभियंता,पा.पु., मा. श्री. एस.पी. काळे-उपअभियता(ड्रेनेज), मा.श्री गायकवाड डी.एन.-उदयान अधिक्षक- उदयान विभाग, श्री. निखील फेंडर, इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, अनुराधा गणपत गोरखे यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक६:-** सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे यांचा दिनांक ०९/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१० दत्तनगर झोपडपट्टी येथील अडवाणी कंपनी शेजारील जुने शौचालय पाडून १२ सिट्सचे नवीन शौचालय बांधणे.

**विषय क्रमांक७:-** सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे यांचा दिनांक ०९/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१० दत्तनगर झोपडपट्टी धोबीघाट येथील जुने महिलांचे १० सिट्सचे शौचालय पाडून त्या ठिकाणी आरोग्य निरिक्षक कार्यालय बांधणे.

**विषय क्रमांक८:-** सन्मा.सदस्य प्रमोद कुटे यांचा दिनांक ०९/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१४ मोहननगर,महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमधील जुनी बालवाडी पाडून नवीन दुमजली इमारत बांधणे.

**विषय क्रमांक९:-** सन्मा.सदस्य राजू मिसाळ यांचा दिनांक ०९/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

मा.अ प्रभाग समिती सभा ठराव क्र.७२ दिनांक ३०/११/२०१६ रोजीच्या ठरावामध्ये नावात सुधारणा करणे.

**विषय क्रमांक१०:-** सन्मा.सदस्या शर्मिला बाबर यांचा दिनांक ०९/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

विठ्ठल रुखमाई मंदिर येथील बागेतील मुतारी(टॉयलेट) बाबत.

**विषय क्रमांक११:-** सन्मा.सदस्या शैलजा अविनाश मोरे यांचा दिनांक ०९/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज चौक,प्राधिकरण येथे नाममुद्रा शिल्प उभारणे.

(कृ.मा.प.)

**विषय क्रमांक १२:- दि.२७/०३/२०१८ रोजीचे शहर फेरिवाला समितीचे सभावृत्तांताचे अनुषंगाने** अ क्षे.का.प्रशासन यांचेकडील आदेश क्रमांक अक्षेका/२/कावि/२४५/२०१८ दिनांक ०८/१०/२०१८ .

आदेश क्र.अक्षेका/२/कावि/२४५/२०१८ दि.०८/१०/२०१८ चे अन्वये गठीत करण्यात आलेल्या हॉकर्स झोन पुर्न:स्थापित करणेसाठी स्थापन करणेत आलेल्या उपसमितीस मान्यता घेणे.

**विषय क्रमांक १३ :-** सन्मा.सदस्या कोमल मेवानी यांचा दिनांक ०९/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ मधील स्मशानभूमिची दुरावस्था झाल्याने दुरुस्ती करणे, शेड बांधणे,आरसीसी करणे, खुर्च्या बसविणे व ड्रेनेज साफसफाईची कामे करणे.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

अनुमोदक-मा.जावेद शेख

सूचक-मा.वैशाली काळभोर

जीवन गायकवाड, कार्यकारी अभियंता यांचे दुख:द निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून दिनांक ९/१०/२०१८ रोजीची अ प्रभाग समितीची सभा दिनांक सोमवार दिनांक १५/१०/२०१८ रोजी स.११.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-------------------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

सन्मा.सभापती- सोमवार दिनांक १५/१०/२०१८ रोजी स.११.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

[ अनुराधा गणपत गोरखे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

### अ प्रभाग समिती

### सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक ०७]

**वेळ : सकाळी ११.०० वा.**

**दिनांक : १५/१०/२०१८**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर **2018** ची दिनांक ९/१०/२०१८ रोजीची मासिक तहकूब सभा सोमवार दिनांक १५/१०/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील **" राजमाता जिजाऊ सभागृह "** येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

1. मा. अनुराधा गणपत गोरखे — सभापती
2. मा.तुषार रघुनाथ हिंगे — सदस्य
3. मा.यादव मिनल विशाल — सदस्या
4. मा.वैशाली जालिंदर काळभोर — सदस्या
5. मा.प्रमोद कुटे — सदस्य
6. मा.राजू मिसाळ — सदस्य
7. मा. शैलजा अविनाश मोरे — सदस्या / माजी उपमहापौर
8. मा. कोमल दिपक मेवानी — सदस्या
9. मा. कदम सुनिल मानसिंग — स्वीकृत सदस्य
10. मा.कांबळे राजेंद्र नामदेव — स्वीकृत सदस्य

याशिवाय मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे,-क्षेत्रिय अधिकारी, मा. श्री दिपक सुपेकर--प्र.कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री. संजय खाबडे-कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री आर.के.लटपटे –प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), मा.श्री कदम पी.जे.-लेखाधिकारी, मा.श्री. महादेव शिंदे –सहा. आरोग्याधिकारी, मा.श्री मोहन खोंद्रे व मा.श्री हरिदास सुनिल-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य ), मा.श्री विजय जाधव्-उपअभियंता(उदयान) मा.श्री चंद्रकांत मुठाळ व मा.श्री लक्ष्मीकांत कोल्हे-उपअभियता(स्थापत्य), मा.श्री कुंभार डी. एम.-उपअभियंता,पा.पु., मा. श्री. एस.पी. काळे-उपअभियता(ड्रेनेज), मा.श्रीमती लता बाबर-उपअभियता(विद्युत), गायकवाड पी.एम.-उदयान अधिक्षक उदयान विभाग,गोसावी जी.आर.,सहा.उदयान अधिक्षक, श्री डी.जी.कांबळे उदयान सहाय्यक श्री. निखील फेंडर, श्री सचिन लोणे, श्री कुरुप व्ही बी.-क.अ. इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, अनुराधा गणपत गोरखे यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

तदनंतर दिनांक ११/०९/२०१८ रोजी झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा (**कार्यपत्रिका क्र.६**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---

ठराव क्रमांक 38
दिनांक- 15/10/2018
सुचक: मा. मीनल यादव

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.कोमल मेवानी

संदर्भ: १. काळुराम गायकवाड अध्यक्ष, महात्मा फुले जनसेवा मंडळ यांचे दिनांक २१/०८/२०१८ रोजीचे पत्र.
२.मा.महापौर कार्यालयाकडील पत्र क्र.महा/कावि/१००३/२०१८ दिनांक २७/८/२०१८.

श्री काळुराम गायकवाड, अध्यक्ष,महात्मा फुले जनसेवा मंडळ यांचे दि.२१/८/२०१८ रोजीचे पत्रावर मा.महापौर कार्यालयाकडील पत्र क्र.महा/कावि/१००३/२०१८ दि.२७/८/२०१८अन्वये पुढील आवश्यक कार्यवाही करणेकामी कळविण्यात आलेनुसार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकामधील सभागृहास "कै.विजय सदाशिव जाधव" यांचे नाव देणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 39
दिनांक 15/10/2018
सुचक: मा. प्रमोद कुटे

विषय क्रमांक 2
विभाग : नगरसचिव(मुख्य कार्यालय)
अनुमोदक : मा. मिनल यादव.

संदर्भ:- नगरसचिव कार्यालय यांचेकडील पत्र क्र.नस/०४/कावि/६२२/२०१८ दिनांक २१/०९/२०१८रोजीचे पत्र.

नगरसचिव कार्यालयाकडील पत्र क्रमांक नस/०४/कावि/६२२/२०१८ दि.२१/०९/२०१८ अन्वये कळविलेनुसार मा. प्रभाग समिती नामनिर्देशित सदस्य् यांना आयडेंटीटी कार्ड, व्हिजीटींग कार्ड,शिफारस पत्र,लेटरपॅड इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 40
दिनांक 15/10/2018
सुचक: मा. प्रमोद कुटे

विषय क्रमांक 3
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक: मा.वैशाली काळभोर

संदर्भ :- सन्मा. सदस्य जावेद शेख यांचा दि.26/09/2018 रोजीचा प्रस्ताव.

आकुर्डी पांढारकर नगर येथे बिना इंग्लिश मिडीयम स्कूल असून सदरच्या शाळेसमोर सार्वजनिक स्वच्छतागृह व मुतारी असून या मुतारीमुळे तसेच तेथील रहिवासी तेथेच कचरा टाकतात व लहान मुलांना शौचास बसवितात त्यामुळे शाळेतील मुलांच्या आरोग्याची गंभीर समस्या बनली आहे. तरी सदरची मुतारी काढून टाकण्यात यावी व त्या परिसराच्या स्वच्छतेसाठी तेथे वाचनालय पानपोई बसविणे असा मूळ प्रस्ताव होता. सदर प्रस्तावावर चर्चा झाली असता, मुतारी काढून टाकण्याबाबत नियमानुसार माहिती घेऊन स्थापत्य विभागाने कारवाई करावी तसेच त्या परिसरात स्वच्छतेसाठी वाचनालय व पानपोई बसविणेस मान्यता देणेत आली.

त्याच बरोबर शाळेसमोरील दोन्ही मार्गावर "पुढे शाळा आहे" असा दिशादर्शक बोर्ड लावणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 41
दिनांक- 15/10/2018
सुचक: मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 4
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.मिनल यादव

संदर्भ: सन्मा.अध्यक्षा अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक ३/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा काळभोरनगर यांचे दि.२७/९/२०१८ चे पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार प्रभाग क्र.१४ मधील स्वामी विवेकानंद प्राथमिक शाळा काळभोरनगर या शाळेचा रंग खूप खराब झाला असून त्याची रंगरंगोटी तसेच कंपाऊंडवरील तारेचे कुंपण करुन देणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 42
दिनांक- 15/10/2018
सुचक: मा. कोमल मेवानी

विषय क्रमांक 5
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

संदर्भ: सन्मा.अध्यक्षा अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक ०३/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे यांचे दि.३/१०/२०१८ चे पत्रानुसार प्र.क्र.10 मधील खालील नमूद केलेल्या ठिकाणी चौकांचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे.

१. ऍटो क्लस्टर जवळील लिंगायत स्मशानभूमिकडे जाणा-या रोडवरील चौकाचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत आली.
२. बर्ड व्हॅली समोरील चौकाचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत आली.
३. मोरवाडी कोर्टासमोरील लालटोपीनगरकडे जाणा-या रस्त्यावरील चौकाचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत आली.
४. आंबेडकर चौक,संभाजीनगर, चिंचवड या चौकाचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

विषय क्रमांक 6
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.कोमल मेवानी

ठराव क्रमांक 43
दिनांक- 15/10/2018
सुचक: मा. राजू मिसाळ

संदर्भ: सन्मा.अध्यक्षा अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक ९/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 10 दत्तनगर झोपडपट्टी येथील अडवाणी कंपनी शेजारील ब-याच वर्षापासून जुने शौचालय आहे, सदर ठिकाणी सेप्टीक टँक वारंवार लिकेज होऊन दुर्गंधी पसरत आहे. तरी दत्तनगर झोपडपट्टीतील नागरिकांचे मागणी प्रमाणे नागरिकांसाठी सदर जुने शौचालय पाडून १२ सिट्सचे नवीन आर.सी.सी.शौचालय बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

विषय क्रमांक 7
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.कोमल मेवानी

ठराव क्रमांक 44
दिनांक- 15/10/2018
सुचक: मा. राजू मिसाळ

संदर्भ: सन्मा.अध्यक्षा अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक ९/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 10 मधील दत्तनगर झोपडपट्टी धोबीघाट येथील जुने महिलांचे १० सिट्सचे शौचालय पाडून त्या ठिकाणी आरोग्य निरिक्षक कार्यालय बांधणे आवश्यक आहे. तरी ब-याच वर्षापासून वापराविना पडून असलेले जुने शौचालय आहे, तसेच शेजारी १८ सिट्सचे नवीन शौचालय बांधणेत आलेले असून शेजारी पुरुषांचे २६ सिट्सचे सुलभ शौचालय बांधणेत आलेले आहे. सदर शौचालय जुने झाल्यामुळे वापर होत नाही. तरी सदर दत्तनगर झोपडपट्टीतील आरोग्य विभागाचे व नागरिकांचे मागणीप्रमाणे सदर जुने वापरात नसलेले शौचालय पाडून नवीन आर.सी.सी.आरोग्य कार्यालय बांधण्यास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

विषय क्रमांक 8
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.कोमल मेवानी

ठराव क्रमांक 45
दिनांक- 15/10/2018
सुचक: मा. राजू मिसाळ

संदर्भ: सन्मा.सदस्य प्रमोद कुटे यांचा दिनांक ९/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 14 मधील मोहननगर,महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमधील जुनी बालवाडी आहे त्याचे जुने पत्र्याचे छप्पर आहे, सदर बालवाडी जुनी झालेली आहे. तरी नागरिकांच्या सोईच्या दृष्टीने सदर जुनी बालवाडी पाडून त्याच ठिकाणी नवीन आर.सी.सी. दुमजली बालवाडी इमारत बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

विषय क्रमांक 9
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

ठराव क्रमांक 46
दिनांक- 15/10/2018
सुचक: मा. राजू मिसाळ

संदर्भ: सन्मा.सदस्य राजू मिसाळ व मा.अमित गावडे यांचा दिनांक ११/९/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

मा.अ प्रभाग समिती ठराव क्र.७२ दिनांक ३०/११/२०१६ अन्वये प्रभाग क्रमांक 15 भक्ती शक्ती उद्यान निगडी येथील सेक्टर नं.२३ वाहतूकनगरी येथे स्थापत्य अ क्षेत्रिय कार्यालयामार्फत स्वागत कमान करणेत येत आहे. सदर स्वागत कमानीस "पिंपरी चिंचवड महानगरपालिका हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वार असे नामकरण करणेत आले आहे. सद्य परिस्थितीत सदर ठरावात मूळ ठराव न बदलता सुधारणा करणेत यावी. मूळ ठरावानुसार बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वार ऐवजी "हिंदुहृदयाम्राट बाळासाहेब ठाकरे वाहतुकनगरी व कै.बाबासाहेब धुमाळ प्रवेशद्वार" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 47
दिनांक- 15/10/2018
सुचक: मा.अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 10
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.शैलजा मोरे

संदर्भ: सन्मा.शर्मिला बाबर यांचा दि.१/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

शिवछत्रपती प्रा.विद्यामंदिर व ब्रम्हदत्त विद्यालय या दोन्ही शाळेतील अंदाजे २०० विद्यार्थी टॉयलेटचा वापर करीत आहेत. टॉयलेटची साफसफाई नीट होत नाही. पाण्याची सोय नाही. ड्रेनेज लाईन तुंबणे,वास येणे इ.समस्या वरील शाळांमध्ये आहे. तसेच समोर बाग-बगीचा असल्याने बागेत येणा-या नागरिकांना दुर्गंधीचा त्रास होत आहे तसेच शाळेतील मुले आजारी पडतात व डेंग्युसारखे आजार वारंवार होत असून तेथील नागरिकांना त्रास होत आहे यास्तव सदरचे टॉयलेट त्वरीत हटवून टाकावे असा मूळ प्रस्ताव होता. सदर प्रस्तावावर सांगोपांग चर्चा झाली असता, शाळेतील २०० विद्यार्थी टॉयलेटचा वापर करीत असल्याचे मूळ प्रस्तावात नमूद केले असल्यामुळे सदर ठिकाणी स्थापत्य विभागाकडून पाहणी करुन सदर टॉयलेट(मुतारी) स्थलांतरित करावे व तदनंतर सदरचे टॉयलेट हटवून टाकणेस मान्यता देणेत येत आहे. तोपर्यंत सदर ठिकाणी पाणीपुरवठा सुरळीतपणे करणेत येऊन सदर टॉयलेटची नियमितपणे साफसफाई ठेवणेत यावी व आवश्यकता असल्यास दुरुस्ती करुन घेणेस सर्वानुमते मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 48
दिनांक- 15/10/2018
सुचक: मा. शैलजा मोरे

विषय क्रमांक 11
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे

संदर्भ: सन्मा.सदस्या शैलजा मोरे यांचा दि.०९/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक, प्राधिकरण येथे धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांचे नाममुद्राशिल्प उभारण्यास तसेच सदर चौकाचे सुशोभिकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 49
दिनांक- 15/10/2018
सुचक: मा. राजू मिसाळ

विषय क्रमांक 12
विभाग : अक्षेका प्रशासन विभाग
अनुमोदक : मा.कोमल मेवानी

संदर्भ: आदेश क्रमांक अक्षेका/२/कावि/२४५/२०१८ दिनांक ८/१०/२०१८.

दिनांक २७/३/२०१८ रोजीचे शहर फेरीवाला समिती बैठकीचे सभावृत्तांताचे अनुषंगाने हॉकर्स झोन पुनःस्थापित करणेसाठी आदेश क्रमांक अक्षेका/२/कावि/२४५/२०१८ दिनांक ८/१०/२०१८. अन्वये खालील नमूद प्रमाणे मा.प्रभाग अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या अ प्रभाग फेरिवाला उपसमितीस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | सदस्य | नावे |
|---|---|---|
| १. | प्रभाग फेरीवाला उपसमिती अध्यक्ष तथा क्षेत्रीय अधिकारी | श्रीम.आशादेवी मारूती दुरगुडे |
| २. | संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता | श्री.दिपक शंकर सुपेकर |
| ३. | उपसंचालक नगररचना यांनी नेमलेला नगररचना विभागाचा प्रतिनिधी | श्री.विनायक माने |
| ४. | वाहतुक शाखेतील पोलिस निरीक्षक | पोलीस इन्सपेक्टर |
| ६. | एफ.डी.ए.प्रतिनिधी | फुड इन्सपेक्टर |
| ७. | मुख्य कार्यालयाचे अतिक्रमण पथकातील सदस्य | श्री.अरूणकुमार शामरावजी सोनकुसरे |
| ८. | ३ अशासकीय सदस्य / शहर फेरीवाला सदस्य | १.श्री.रमेश साधू शिंदे –<br>२.श्री.इरफान लाडकेसाइ चौधरी<br>३.श्री.कासीम शेखअमर तांबोळी<br>४.श्री.दामोदर विठोबा मांजरे<br>५.श्रीम.सुनीता दत्ता सरकटे |

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

विषय क्रमांक 13
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

ठराव क्रमांक 50
दिनांक- 15/10/2018
सुचक: मा. कोमल मेवानी

संदर्भ: सन्मा.सदस्या कोमल मेवानी यांचा दि.९/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 19 मधील लिंक रोड येथील स्मशानभूमिची खूपच दुरावस्था झालेली असल्याने तेथे दुरुस्ती करणे, खुर्च्या बसिवणे, शेड बांधणे, आर.सी.सी. करणे तसेच ड्रेनेज लाईन सफाई इ. त्वरीत करणेचे कामास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती- अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ अनुराधा गणपत गोरखे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेका/9/कावि/191 /2018 दिनांक:- 30 /10 /2018

(रामकिसन लटपटे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति.
सर्व संबंधित ------------------------